सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत गडचिरोली जिल्ह्यातील कुरखेडा व भामरागड तालुक्यांमध्ये टाटा ट्रस्टच्या सहाय्याने फोर्टिफाईड तांदुळ वितरित करण्यासंदर्भातील प्रकल्प प्रायोगिक तत्वावर राबविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण- २६१८/१४९-५२ प्र.क्र. २६/नापु २९

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: ०१ जून, २०१८

प्रस्तावना :

आधारभूत किंमत खरेदी योजना ही केंद्र शासनाची योजना असून राज्य शासनाद्वारे राबविण्यात येते. सदर योजनेंतर्गत राज्यात हंगाम २०१६-१७ पासून विकेंद्रित धान खरेदी योजना राबविण्यात येते. या योजनेतून खरेदी केलेला धान, ज्वारी, बाजरी व मका लक्ष्यनिधारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत रास्त भाव दुकानांद्वारे वितरित केला जातो.

देशात आणि राज्यात ॲनिमियाचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणात आहे. २०१५-१६ च्या चौथ्या राष्ट्रीय आरोग्य सर्वेक्षणानुसार, महाराष्ट्रातील ५३.८% मुलांमध्ये (वय ६ महिने ते ५ वर्ष), १० ते १८ वर्ष वयाच्या मुलींमध्ये ३८% व गर्भधारक महिलांमध्ये ५६% इतक्या मोठ्या प्रमाणात ॲनिमिया असल्याचे दिसून आले आहे. ॲनिमिया प्रामुख्याने रोजच्या जेवणात Vit A, B९/फॉलेट व B१२ या पोषणद्रव्यांच्या कमतरतेमुळे दिसून येतो. संशोधनाने हे सिद्ध केले गेले आहे की, जर पुरेश्या प्रमाणात जेवणातून लोह व इतर पोषकद्रव्य दिल्यास ॲनिमिया मोठ्या प्रमाणात नियंत्रणात आणता येतो. सद्यस्थितीमध्ये लोहयुक्त गोळ्या देणे इ. पर्यायाने सरकारमार्फत ॲनिमिया नियंत्रणाचा प्रयत्न होत आहे. सदर उपाययोजनेला पूरक ठरतील अशा उपाययोजना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. अशा उपाययोजना सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत वितरित करण्यात येणाऱ्या अन्नधान्यामार्फत करण्याबाबतचा प्रस्ताव टाटा ट्रस्टद्वारे शासनाकडे सादर करण्यात आला होता. त्यानुसार सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत वितरित करण्यात येणारा तांदुळ फॉर्टिफाइड करण्याबाबतचा प्रकल्प टाटा ट्रस्टच्या सहकार्याने प्रायोगिक तत्वावर गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड व कुरखेडा या तालुक्यांमध्ये राबविण्याचा निर्णय शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय -

सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत फोर्टिफाइड तांदुळ वितरित करण्याबाबतचा प्रकल्प प्रायोगिक तत्वावर गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड व कुरखेडा या तालुक्यांमध्ये सुरु झाल्याच्या दिनांकापासून १२ महिन्यांसाठी प्रायोगिक तत्वावर राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर प्रकल्प प्रायोगिक तत्वावर असल्याने, भरडाईच्या प्रक्रियेदरम्यान तांदुळ फोर्टिफाईड करण्यासाठी गडचिरोली जिल्ह्यातील कोणत्याही एका मिलरची निवड टाटा ट्रस्ट, जिल्हाधिकारी व राज्य शासन यांच्या संयुक्त निर्णयाद्वारे करण्यात येईल.

सदर प्रायोगिक प्रकल्प राबविण्याकरिता करारनामा जिल्हाधिकारी व टाटा ट्रस्ट यांच्यात होईल व त्यातील नमूद अटी शर्तीनुसार सदर प्रकल्पाची कार्यवाही होईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०६०११५५३५२८४०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Satish Shridhar Supe

Digitally signed by Satish Shridhar Supe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Food Civil Supplies And Consumer Protection Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f7773ccec10687b16ba0f2d3f7f9e6f87fe68f9b1b2cb5b73b75bab952ca0621, cn=Satish Shridhar Supe
Date: 2018.06.01 15:54:02 +05'30'

(सतीश सुपे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. मा. मंत्री, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव.
४. मा. मंत्री, वित्त यांचे खाजगी सचिव.
५. मा. मंत्री, पणन यांचे खाजगी सचिव.
६. मा. मंत्री, आदिवासी विकास, यांचे खाजगी सचिव.
७. मा. विरोधी पक्ष नेते (विधानसभा, विधानपरिषद)
८. मा. राज्यमंत्री, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, यांचे खाजगी सचिव.
९. मा. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
१०. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई.
११. अपर मुख्य सचिव, (वित्त) महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
१२. प्रधान सचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.
१३. अपर मुख्य सचिव, कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४. अपर मुख्य सचिव (पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय,मुंबई.
१५. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय,मुंबई.
१६. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई.
१७. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र स्टेट को.ऑप.मार्केटिंग फेडरेशन लि., कनमूर हाऊस,नरसी नाथा स्ट्रीट,मुंबई- ४०० ००९,
१८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, आदिवासी विकास भवन, २ रा माळा, राम गणेश गडकरी चौक, जुना आग्रा रोड,नाशिक-२,
१९. सर्व विभागीय आयुक्त.
२०. नियंत्रक (शिधावाटप) व संचालक नागरी पुरवठा(गो/वा),मुंबई,
२१. सर्व जिल्हाधिकारी,
२२. सर्व उप आयुक्त (पुरवठा),
२३. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी,

२४. सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी,
२५. वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई,
२६. उप संचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्त कार्यालय, मुंबई.
२७. सहसचिव /सर्व उप सचिव/अवर सचिव/सर्व अधिकारी,अ.ना.पु.व ग्रा.सं.विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई,
२८. सर व्यवस्थापक,(महा.) भारतीय अन्न महामंडळ,५ वा माळा, राजेंद्र नगर, दत्तपाडा रोड, बोरीवली पूर्व मुंबई-४०० ०६६.
२९. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (५ प्रती),
३०. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,ग्रंथालय ६ वा मजला,विधान भवन,मुंबई. (१०प्रती)
३१. मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची कार्यालये, (प्रत्येकी ५ प्रती),
३२. सर्व विधान परिषद सदस्य व विधान सभा सदस्य
३३. निवड नस्ती (नापु-२९).